“मानवमुक्तीच्या लढ्यातील आंबेडकरी चळवळीचे योगदान”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

बाळासाहेब मारोतीराव रोहिणेकर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दयानंद माधवराव गुडेवार

एम.ए., बी.एड., एम.फिल., नेट, पीएच.डी.

राज्यशास्त्र विभागप्रमुख

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता.जळकोट जि.लातूर.

सदस्य-राज्यशास्त्र अभ्यास मंडळ

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

सप्टेंबर - 2023

“मानवमुक्तीच्या लढ्यातील आंबेडकरी चळवळीचे योगदान”

- **प्रस्तावना :**

'वसुधैव कुटुंबकम्' चा जगाला संदेश देणाऱ्या भारतामध्ये मानवी समाजाचे वर्गीकरण चार भागात केले जात होते. ते म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र. नंतरच्या उत्तर वैदिक कालखंडात जन्मावर आधारित वर्गीकरणाला मान्यता देणारा 'मनुस्मृती' नावाचा ग्रंथ लिहिला. त्याची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे केली जाऊ लागली. या मनुस्मृतीनुसार शुद्रांना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णीकांची सेवा करणे बंधनकारक ठरू लागले. त्यातूनच जातियता दृढ होत गेली. हजारो वर्षांपासून मानवी मनामध्ये घर करून बसलेल्या जातियतेच्या या विषारी विचाराने मानवी बुद्धीला पूर्णपणे पोखरून टाकले. या जातियतेवरुनच माणसाच्या माणुसकीला कलंक लागण्याइतपत शुद्रांचा अमानुष छळ केला जात असे. शुद्रांचे जगण्याचे सर्व अधिकार हिसकावून घेवून त्यांना हजारो वर्षे गुलामीच्या प्रचंड अंधारात ठेवले गेले. या गुलामीविरोधात लढा देण्यासाठी एक चळवळ उभी राहिली ती म्हणजे दलित चळवळ. या दलित चळवळीने मानवमुक्तीच्या लढ्यात खूप मोठे योगदान दिले आहे. या दलित चळवळीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानामुळेच या दलित चळवळीला आंबेडकरी चळवळ असेही म्हटले जाते. या दलित (आंबेडकरी) चळवळीचे खालीलप्रमाणे तीन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

1) आंबेडकरपूर्व दलित चळवळ :

महात्मा फुले

आंबेडकरपूर्व दलित चळवळीत महात्मा फुले यांचे मोलाचे योगदान राहिलेले आहे.

- इ.स.1851 मध्ये पुण्यात नाना पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरू केली.

- 1852 मध्ये दलितांसाठी वाचनालय काढले.
- 10 सप्टेंबर 1853 मध्ये पुण्यात महार-मांग इत्यादी लोकांस विद्या शिकवणारी मंडळी नावाची संस्था स्थापन केली.
- 1868 मध्ये स्वत:च्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.
- 1873 मध्ये अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला गेला.
- 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करून अस्पृश्यांनाही ईश्वर भक्ती करण्याचा अधिकार असल्याचे प्रतिपादित केले.

गोपाळ बाबा वलंगकर :

- यांच्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता.
- 1890 मध्ये दापोली येथे 'अनार्यदोष परिहार' समाजाची स्थापना केली जी की ही दलितांच्या उद्धारासाठी होती.
- 'विटाळ विध्वंसक' हा ग्रंथ लिहून अस्पृश्यतेचे खंडन केले आहे.

शिवराम जानबा कांबळे:

महात्मा फुले, वलंगकर, बाबा पद्मनजी, आगरकर, लोकहितवादी यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता.

- वेद हे ईश्वरनिर्मित नाही तर ते मानव निर्मित आहेत. अस्पृश्यतेला हिंदू धर्मात कशाचाही आधार नाही असे सांगितले.
- अस्पृश्यांना पोलिस लष्करामध्ये नोकऱ्या मिळाव्यात व त्यांच्या मुलांचे शिक्षण सरकारने करावे यासाठी शाळा व वाचनालय सुरू करण्याच्या उद्देशाने पुण्यामध्ये 1904 साली 'प्रसादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' या संस्थेची स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराज :

महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता.

- सर्वप्रथम 'अस्पृश्यता विरोधी कायदा' आपल्या कोल्हापूर संस्थानात आणला.
- 1902 मध्ये कोल्हापूर संस्थानात सरकारी नौकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी 50% राखीव जागांची तरतूद केली.
- महार वतने रद्द करून त्या जमिनी अस्पृश्यांच्या नावे करून दिल्या.
- 1920 मध्ये माणगाव येथे पहिली 'अस्पृश्य परिषद' त्यांनी भरविली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्यांचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले.
- 31 जानेवारी 1920 मध्ये 'मूकनायक' या आंबेडकरांच्या पहिल्या पाक्षिकासाठी आर्थिक मदत केली.
- अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा व वसतिगृहाची सोय केली.

महाराजा सयाजीराव गायकवाड:

- परिवर्तनवादी विचाराचे कट्टर पुरस्कर्ते होते.
- डॉ.आंबेडकरांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेस शिक्षणासाठी पाठविले.
- 23 मार्च 1918 रोजी मुंबई येथे 'अस्पृश्यता निवारक परिषद' भरविली. या परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड हे होते.

महर्षी वि.रा. शिंदे :

- प्रार्थना समाजाचे ते प्रचारक होते.
- 1912 मध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेज येथे अस्पृश्य व ब्राह्मण यांच्या एकत्र सहभोजनाचा कार्यक्रम घेतला.

किसन फागूजी बनसोडे:

- अस्पृश्यांची शैक्षणिक, आर्थिक प्रगती व्हावी यासाठी 'सन्मानबोधक निराप्रित समाज' याची स्थापना केली होती.
- आपल्या सहकार्याच्या मदतीने 'चोखामेळा सुधारणा मंडळ' व वाचनालय स्थापन केले होते.

2) आंबेडकरालीन दलित चळवळ :

अस्पृश्यांमध्ये जागृतीसाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे महापुरुष म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. अस्पृश्यतेचे चटके त्यांनी लहानपणापासून सोसले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उच्च शिक्षण घेऊन त्यांनी अस्पृश्यांसाठी, त्यांच्या हक्कासांठी लढा उभारला. यासाठी त्यांनी 'मूकनायक', 'समता', 'बहिष्कृत भारत' अशा वर्तमानपत्रातून त्यांनी जाणीवजागृती केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा बहुमोल संघर्ष त्यांनी दलितांना दिला. पाणी ही नैसर्गिक देणगी असूनसुद्धा अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणवठ्यावर पाणी पिऊ दिले जात नव्हते. याविरुद्ध त्यांनी 25 मार्च 1920 सत्याग्रह केला. स्त्री-पुरुष, दलित यांच्यात भेदभाव करणारी, समाजात विषमता पसरविणाऱ्या 'मनुस्मृती'चे त्यांनी 25 डिसेंबर 1927 रोजी जाहीर दहन केले. दलितांना मंदिर प्रवेश नाकारला जात असल्यामुळे 3 मार्च 1930 रोजी नाशिक येथील ‘काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह’ करून त्यांनी हा लढा अधिक व्यापक केला. पुढे 1931 च्या गोलमेज परिषदेला हजर राहून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती. यासाठी 15 ऑगस्ट 1936 ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून 1937 च्या निवडणूक लढवून 13 जागा जिंकल्या होत्या. भारतीय संविधानाच्या समुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सर्वांना समान हक्क अधिकार देणाऱ्या अद्‌वितीय संविधानाची निर्मिती केली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांवर आधारित असलेले भारताचे संविधान दलितांच्या उत्थानासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. भारत सरकारमध्ये कायदा मंत्री होऊन अस्पृश्यांच्या हक्कांसाठी झगडून त्यांनी संविधानातील विविध तरतूदीच्या आधारे सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा केवळ अस्पृश्यता निवारण हा एकमेव हेतू नव्हता. तर सर्व प्रकारच्या शोषणापासून मानवाच्या मुक्तीसाठीचा हा लढा होता.

3) आंबेडकरोत्तर दलित चळवळ :

दादासाहेब गायकवाड, जी.टी. मेश्राम, सी.एन. शिवराज, बी.बी. कांबळे, गवई, बलवंतराय बराळे, बी.जी. खोब्रागडे, हरिहर सोनवणे इत्यादींनी आंबेडकरी चळवळ पुढे नेली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून 3 ऑक्टोबर 1957 रोजी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. दलितांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रश्न न संपल्यामुळे आणि अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत असल्यामुळे अमेरिकेच्या ब्लॅक पँथरच्या धर्तीवर 21 मे 1972 रोजी नामदेव ढसाळ, ज.वि. पवार यांनी 'दलित पँथर' या लढवय्या संघटनेची स्थापना केली. यात नामदेव ढसाळ, रामदास आठवले, ज.वि. पवार, रामदास सोरटे, अरुण कांबळे इत्यादींनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. औरंगाबाद येथील विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे म्हणून अभूतपूर्व असा लढा उभारला गेला. ज्याला 'विद्यापीठ नामांतर आंदोलन' म्हणून ओळखले जाते. या चळवळीने अत्यंत विद्रोही मोर्चे, आंदोलने करून यश मिळविले. परिणामी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद' असे नामांतर झाले. राजकीय पक्षातील अनेक गटामुळे दलितांची पाहिजे तेवढी एकजूट होऊ शकली नाही हे दलित चळवळीचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

- **संशोधनाचे महत्त्व :**

आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर दलित चळवळीने मानव मुक्तीच्या लढ्यात कसे योगदान दिले आहे? हे प्रस्तुत संशोधनात अभ्यासावयाचे असल्यामुळे हे संशोधन महत्त्वाचे ठरते. आंबेडकरी चळवळीमध्ये असंख्य कार्यकर्ते, नेते, राजकीय पक्ष, संघटना, संस्था, साहित्यिक, कवी, पत्रकार, संपादक यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. लोकशाही मूल्यांची स्थापना करण्यात ही चळवळ किती प्रमाणात यशस्वी झाली? त्यांनी केलेले शोषित, वंचितांसाठीचे प्रयत्न, राहणीमानाचा दर्जा, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक, आर्थिक जीवनात झालेल्या बदलांचाही अभ्यास करणे येथे अपरिहार्य ठरते. दलित चळवळीला पर्यायाने मानव मुक्तीच्या लढ्याला ज्या

बाबींमुळे आकार येत गेला. त्या सर्व बाबी अभ्यासणे प्रस्तुत संशोधनाचे प्रयोजन असणार आहे. त्यामुळे संशोधन विषयाचे आगळेवेगळे महत्त्व असणार आहे.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन व आंबेडकरोत्तर चळवळीचा आढावा घेणे.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानव मुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

3) आंबेडकरी चळवळीमुळे दलितांच्या जीवनातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बदल अभ्यासणे.

4) आंबेडकरी चळवळीचे मानव मुक्तीच्या लढ्यातील योगदान अभ्यासणे.

- **संशोधनाची गृहितके :**

1) भारतीय संविधानानुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास सक्त मनाई असतानासुद्धा जातीय व धार्मिक दंगली होतात.

2) मराठवाडयात बरीच जातविरोधी आंदोलने उदयास आली.

3) आंबेडकरी चळवळीच्या प्रयत्नांमुळे दलितांचे अनेक मूलभूत प्रश्न मार्गी लागलेले दिसून येतात.

4) आंबेडकरी चळवळीने सामाजिक विषमतेत बुडालेल्या मानवाच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले.

5) आंबेडकरी चळवळीमुळे राजकीय नेतृत्व उदयास आलेले दिसून येते.

- **संशोधन पद्धती :**

प्राथमिक स्रोत :

प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत अनुसूची इत्यादींचा आधार घेतला जाईल.

दुय्यम स्रोत :

यात प्रकाशित ग्रंथ, शासकीय संस्थांचे अहवाल, ग्रंथ साहित्य, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल.

तथ्य संकलन :

तथ्य संकलन म्हणजे एक प्रकारचा दस्तऐवज आहे. ज्यात प्रकाशित व अप्रकाशित लिखाणाची, सर्वेक्षणाबद्दल माहिती दिलेली असते. ग्रंथालयामध्ये माहितीच्या स्वरूपावरून जुने ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, शोधनिबंध उपलब्ध असतात व संशोधक त्याचे वाचन करून त्याची मांडणी त्याच्या संशोधनात करतो. प्रकाशित लिखाणाच्या माध्यमातून सर्वेक्षण करून संशोधक स्वत:च्या संशोधनाला चालना देत असतो. त्यामुळे संशोधनात तथ्य संकलनाला खूप महत्त्व आहे. यात प्राथमिक स्रोत आणि द्वितीय स्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :

सुनिता शांताराम सावरकर (2021) यांनी "दलित चळवळीतील वैचारिक मतभेदांचे सामाजिक व राजकीय परिणाम (1937-1994)" या अप्रकाशित शोधप्रबंधात 20 व्या शतकातील महाराष्ट्र राज्यातील सामाजिक चळवळी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कालीन दलित राजकारण व संघर्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित चळवळ (1956 ते 1994), दलित चळवळीतील अंतर्गत मतभेदांचे स्वरूप आणि दलित चळवळीतील वैचारिक मतभेदांचे राजकीय व सामाजिक परिणाम अभ्यासले आहेत.

गरिमा धनकार, सहा.प्राध्यापक दिल्ली विद्यापीठ यांनी 'International Journal of Political Science and Governance (2022)' यात प्रसिध्द केलेल्या 'Dalit movements in India and the role of Ambedkar' या शोधनिबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे दलित चळवळीद्वारे लोकशाहीला चालना मिळाली असून भारतीय समाजाची व्यवस्था बऱ्याच अंशी बदलली आहे असे मत व्यक्त केले आहे.

प्रकरण मांडणी:

प्रस्तुत शोधप्रबंधाची मांडणी एकूण सात प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, संशोधनाची व्याप्ती, संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाच्या मर्यादा, संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - सामाजिक चळवळ संकल्पना व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात मानवमुक्ती आणि सामाजिक चळवळीचा अर्थ व व्याख्या, स्वरूप, वैशिष्ट्ये आणि महत्त्व इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - डॉ.बाबासाहेब आंबेडकरपूर्व कालीन भारतातील सामाजिक चळवळी

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरपूर्व काळातील विविध सामाजिक आणि दलित चळवळीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मानव मुक्तीसाठी लढा

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विविध सामाजिक उपक्रम, चळवळी, आंदोलने इत्यादींच्या माध्यमातून दलितच नव्हे तर संपूर्ण मानवांच्या मुक्तीच्या दृष्टीने केलेल्या विविध लढ्यांचा व प्रयत्नांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - आंबेडकरोत्तर दलित चळवळीत दलित साहित्याचे योगदान

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध कार्याने व विचाराने प्रभावित झालेल्या स्वातंत्र्योत्तर काळातील दलित साहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे- आंबेडकरी चळवळीचा भारतीय समाज जीवनावर झालेला परिणाम : विशेष संदर्भ मराठवाडा

प्रस्तुत प्रकरणात आंबेडकरी चळवळीचा आणि विचारधारेचा मराठवाड्यातील मोजक्याच जिल्ह्यातील लोकांच्या समाजजीवनावर काय परिणाम झाला आहे याचा प्रश्नावली, अनुसूची व मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करून वर्गीकरणाच्या माध्यमातून विश्लेषण केले जाणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये सारांश व संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करून काही शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

1) डॉ.राजेंद्र मोरे-महाराष्ट्रातील दलित चळवळी
2) पी.एस. खडसे-मानवी मूल्यांचा संघर्ष
3) वसंत राजस-आंबेडकरी चळवळीचे मारेकरी
4) एन. लक्ष्मीकांत-इंडियन पॉलिटी, के.सागर पब्लिकेशन, पुणे
5) www.vidhansabha.nic.in
6) www.maharashtra.govi.in
7) https://www.drishtiias.com
7) www.eci.in
8) www.electionindia.com

संशोधक
बाळासाहेब मारोतीराव रोहिणेकर
एम.ए. (राज्यशास्त्र, इतिहास), बी.एड.
मु.पो. (अंबिका) रोहिणा ता.चाकूर जि.लातूर

मार्गदर्शक
प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार
राज्यशास्त्र विभागप्रमुख
उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी
ता.जळकोट जि.लातूर.